उद्धव ठाकरे साहेब यांना खूप खूप शुभेच्छा: एकनाथ शिंदेंनी विधान परिषदेत दिला निरोप; नीलम गोऱ्हे, अमोल मिटकरींचेही केले कौतुक >>पान 2

धनगर आरक्षणासाठी टॉवरवर चढून आंदोलन; गजानन बोरकर ठाम >>पान 3

दुर्गबोरी विकासापासून कोसो दूर; नागरिक त्रस्त, प्रशासन सुस्त >>पान 4

## सुविचार

मी श्रीमंत माणसाचा गुरु आहे. - ओशो

दैनिक
# आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 04 ■ अंक 225 ■ बुधवार, दि. 25 मार्च 2026 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006



'द रिवोल्युशनरीज' फेम प्रतिभा रांटा-रोहित सराफने आपलं नातं लपवलंय? डेटिंगच्या चर्चांना उधाण

आतील पान

# अखेर हरीश राणाची प्राणज्योत मालवली

## १३ वर्षांपासून होता कोमात; सुप्रीम कोर्टाने दिली होती इच्छामृत्यूची परवानगी


**गाझियाबाद/वृत्तसंस्था :** गाझियाबादचे रहिवासी हरीश राणा याचे आज (दि. २४ मार्च) दिल्लीतील एम्स रुग्णालयात निधन झाले. हरीश गेल्या १३ वर्षांपासून कोमात होता. काही दिवसांपूर्वीच देशाच्या सर्वोच्च न्यायालयाने त्यांना 'पॅसिव्ह यूथेनेशिया' म्हणजेच इच्छामृत्यूची परवानगी दिली होती.

हरीशवर अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्थेच्या 'इन्स्टिट्यूट रोटरी कॅन्सर हॉस्पिटल' मध्ये उपचार सुरू होते. त्यांना पॅलिएटिव्ह केअर वॉर्डमध्ये ठेवण्यात आले होते. गेल्या एका आठवड्यापासून डॉक्टरांचे पथक त्यांच्यावर बारकाईने लक्ष ठेवून होते. २३ मार्च रोजी डॉक्टरांनी सांगितले होते की, त्यांना आणखी काही दिवस निरीक्षणाखाली ठेवले जाऊ शकते. गेल्या आठ दिवसांपासून हरीश याला दिले जाणारे अन्न आणि पाणी दिले जात नव्हते. ही कायदेशीर प्रक्रिया सहा दिवसांपासून सुरू होती.

### निधनापूर्वी मातेची करुण प्रार्थना

हरीश यांच्या निधनापूर्वी त्यांची आई रुग्णालयाच्या कॉरिडॉरमध्ये बसून प्रार्थना केली. मुलाचा शेवटचा काळ जवळ आल्याचे





पाहून त्या अत्यंत भावूक झाल्या होत्या. माझा मुलगा श्र्वास घेत आहे, त्याचे ठोके अजूनही सुरू आहेत... तो मला सोडून जात आहे, अशा शब्दांत त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या होत्या.

### इच्छामृत्यूची प्रक्रिया

सर्वोच्च न्यायालयाने परवानगी दिल्यानंतर ही कायदेशीर प्रक्रिया सुरू करण्यात आली होती. १३ वर्षे कोमात राहिल्यानंतर डॉक्टरांच्या विशेष पथकाच्या देखरेखीखाली ही प्रक्रिया पार पडली. एक आठवडा अन्न-पाण्याविना राहिल्यानंतर अखेर हरीशची प्राणज्योत मालवली. हे संपूर्ण प्रकरण अत्यंत गुंतागुंतीचे आणि संवेदनशील होते.

### २०१३ मध्ये झाला होता अपघात

जुलै २०१० मध्ये हरीश याने चंदीगड विद्यापीठात सिव्हिल इंजिनिअरिंगला प्रवेश घेतला होता. २०१३ मध्ये शेवटच्या वर्षाला असताना,रक्षाबंधाच्या दिवशी (ऑगस्ट २०१३) बहिणीशी मोबाईलवर बोलत असताना पीजीच्या चौथ्या मजल्यावरून खाली पडला. या दुर्घटनेत तो गंभीर जखमी झाला. सुरुवातीला चंदीगडच्या पीजीआयमध्ये आणि त्यानंतर डिसेंबर २०१३ मध्ये दिल्लीच्या एलएनजेपी रुग्णालयात त्याला दाखल करण्यात आले. तिथे डॉक्टरांनी सांगितले की, त्यांना 'क्वाड्रिप्लेजिया' झाला आहे. या स्थितीत हात-पाय पूर्णपणे निकामी होतात. हरीश कायमचा अंथरुणाला खिळला.

### सर्वोच्च न्यायालयाने दिली होती इच्छामृत्यूची परवानगी

हरीशला होणार्या असह्य वेदना आणि शारीरिक अवस्था पाहून त्यांच्या पालकांनी दिल्ली उच्च न्यायालयात इच्छामृत्यूसाठी अपील केले होते, परंतु ८ जुलै २०२५ रोजी उच्च न्यायालयाने ते फेटाळले. त्यानंतर कुटुंबाने सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली. अखेर ११ मार्च २०२६ रोजी सर्वोच्च न्यायालयाने इच्छामृत्यूची (पॅसिव्ह यूथेनेशिया) परवानगी दिली होती.

# लोकसभेत ट्रान्सजेंडर हक्क संरक्षण दुरुस्ती विधेयक मंजूर !

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :**ट्रान्सजेंडर व्यक्तींच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी आणि त्यांच्यावरील अन्यायाला आळा घालण्यासाठी केंद्र सरकारने मांडलेले 'ट्रान्सजेंडर व्यक्ती (हक्कांचे संरक्षण) दुरुस्ती विधेयक, २०२६' मंगळवारी लोकसभेत मंजूर करण्यात आले. या नवीन कायद्यानुसार, ट्रान्सजेंडर व्यक्तींवर होणाऱ्या अत्याचाराच्या तीव्रतेनुसार आता शिक्षेचे स्वरूप अधिक कडक करण्यात आले असून, दोषींना १४ वर्षांपर्यंतच्या कारावासाची तरतूद करण्यात आली आहे.

केंद्रीय सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्री वीरेंद्र कुमार यांनी या विधेयकावरील चर्चेला उत्तर देताना स्पष्ट केले की, हे विधेयक प्रामुख्याने जैविक कारणांमुळे सामाजिक बहिष्काराचा सामना करणाऱ्या व्यक्तींना संरक्षण देण्यासाठी आणले गेले आहे.

२०१९ च्या मूळ कायद्यामध्ये गुन्ह्यासाठी कमाल दोन वर्षांच्या शिक्षेची तरतूद होती, जी आता गुन्ह्याच्या गांभीर्यानुसार वाढवण्यात आली आहे. या दुरुस्तीमुळे ट्रान्सजेंडर समुदायाला मिळणारे कायदेशीर संरक्षण अधिक भक्कम होईल, असा विश्वास सरकारने व्यक्त केला आहे. या विधेयकातील सर्वात महत्त्वाचा बदल म्हणजे ट्रान्सजेंडर या संज्ञेची केलेली नवी व्याख्या. सरकारने या कायद्याच्या व्याप्तीतून लैंगिक कल आणि स्वतःहून स्वीकारलेली लैंगिक ओळख यांना वगळले आहे.

केवळ जैविक कारणास्तव ट्रान्सजेंडर असलेल्या व्यक्तींनाच या कायद्याचा लाभ मिळेल, असे सरकारने स्पष्ट केले आहे. विधेयकावरील चर्चेदरम्यान सत्ताधारी आणि विरोधी बाकांवर जोरदार खडाजंगी पाहायला मिळाली. विरोधी पक्षांनी या विधेयकाला कडाडून विरोध करत, हे विधेयक व्यक्तीच्या स्वतःची ओळख निवडण्याच्या अधिकारावर गदा आणणारे असल्याचे म्हटले. समलिंगी व्यक्तींना यातून वगळल्यामुळे त्यांच्या हक्कांचे काय, असा प्रश्न विचारत विरोधकांनी हे विधेयक स्थायी समितीकडे पाठवण्याची मागणी केली होती. मात्र, विरोधकांनी सुचवलेले सर्व बदल आवाजी मतदानाने फेटाळून लावत सभागृहाने या महत्त्वपूर्ण विधेयकाला मंजुरी दिली.

# उद्धव ठाकरेंच्या कोट्या पुन्हा ऐकायला आवडतील; निरोपाच्या भाषणात देवेंद्र फडणवीसांकडून कौतुकाचा वर्षाव

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** विधानपरिषदेत मुदत संपणाऱ्या सदस्यांना निरोप देताना आज भावनिक वातावरण पाहायला मिळाले. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांचे भरभरून कौतुक केले.



फडणवीस म्हणाले की, उद्धव ठाकरे यांनी सहा वर्षे विधानपरिषदेत काम करताना महत्त्वपूर्ण योगदान दिले. ''ते पुन्हा सभागृहात आले तर त्यांच्या कोट्या ऐकायला आम्हाला नक्की आवडेल. त्यांनी ठरवलं तर ते पुन्हा विधान परिषदेत येऊ शकतात,'' असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

तसेच त्यांनी ठाकरेंच्या व्यक्तिमत्त्वावर भाष्य करताना सांगितले की, ''उद्धव ठाकरेंचा स्वभाव पारंपरिक राजकारण्यांसारखा नाही. त्यांच्या स्वभावात स्पष्टवक्तेपणा आहे. बाळासाहेब ठाकरे यांच्यासारखीच त्यांची रोखठोक भूमिका राहिली आहे.'' पुढे त्यांनी पु. ल. देशपांडे यांचा उल्लेख करत, ''शब्दांच्या कोट्यांमध्ये उद्धव ठाकरे यांचा क्रमांक वरचा आहे,'' असेही म्हटले.

दरम्यान, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही उद्धव ठाकरे यांना शुभेच्छा दिल्या. ''राजकारणात पूर्णविराम नसतो, काम सुरूच राहते. आज निवृत्त होणारे सदस्य पुन्हा सभागृहात येतील, याची खात्री आहे,'' असे ते म्हणाले.

शिंदे यांनी पुढे म्हटले की, ''उद्धव ठाकरे साहेबांना निरोगी आणि दीर्घ आयुष्य लाभो, तसेच त्यांच्या पुढील राजकीय वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा.'' विधानपरिषदेत आज निवृत्त होत असलेल्या सदस्यांना निरोप देताना सर्वपक्षीय नेत्यांनी एकमेकांविषयी आदर आणि सद्भावना व्यक्त केल्याचे चित्र पाहायला मिळाले.

# साखर कारखान्यांच्या सक्षमीकरणासाठी फडणवीस सरकारचा मोठा निर्णय! राज्यस्तरीय समिती गठीत

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील साखर उद्योग हा महत्त्वाचा उद्योग असून त्याच्या आर्थिक सहाय्याच्या दृष्टीने राज्यस्तरावर मुख्य सचिवांनी तातडीने समिती गठीत केली आहे. गठित समितीला अहवाल त्वरीत सादर करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत. विधानभवनात साखर उद्योगाच्या प्रश्नांसंदर्भात आयोजित बैठकीत देवेंद्र फडणवीस यांनी संबंधितांना निर्देशित केले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, राज्यातील साखर कारखान्यांच्या आर्थिक अडचणी लक्षात घेता येत्या गाळप हंगामाची व्यापक प्रमाणात सुरवात होण्याच्या दृष्टीने साखर कारखान्यांना शक्य ते आर्थिक सहाय्य करण्यासाठी कृती आराखडा तयार करण्यात यावा. यासाठी मुख्य सचिवांनी राज्यस्तरीय समितीचे गठन करावे, त्यामध्ये सहकार, कृषी, वित्त विभागाचे सचिव, साखर आयुक्त, उद्योग सचिव आणि राज्य सहकारी बँकेचे व्यवस्थापकीय संचालक यांचा समावेश करावा.

या समितीने तातडीने साखर कारखान्यांना येणाऱ्या अडचणी, समस्यांचे स्वरुप, त्याच्या निवारणाचे उपाय, पर्यायी व्यवस्था या अनुषंगाने सखोल अभ्यास करुन अहवाल सादर करावा. त्याच्या माध्यमातून साखर उद्योगासाठीचे पॅकेज राज्य शासनास करता येईल.

तसेच मोठ्या गुळ व खांडसारी प्रकल्पांकरिता राज्य शासनाची नियमन प्रणाली असणे आवश्यक आहे. यासाठीची नियमावली तयार करावी त्याचा मसुदा येत्या पंधरा दिवसात सादर करावा. साखर कारखान्यांच्या अडचणी दूर करुन साखर उद्योगाच्या सक्षमीकरणासाठी राज्य शासन धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी सकारात्मक भूमिकेत आहे.

# अशोक खरात प्रकरणात धक्कादायक वळण; ५ नरबळीचा संशय, ४ दिवसांची पोलीस कोठडी

**दैनिक आपला विदर्भ**

**नाशिक/प्रतिनिधी :** भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणात दिवसेंदिवस नवे आणि धक्कादायक खुलासे समोर येत असून या प्रकरणाची व्याप्ती मोठी असल्याचे संकेत मिळत आहेत. अशोक खरात याने तब्बल पाच नरबळी दिल्याचा संशय सरकारी वकिलांकडून न्यायालयात व्यक्त करण्यात आला आहे. एसआयटीच्या पथकाने अशोक खरात याला नाशिक न्यायालयात हजर केले. यावेळी सरकारी वकिलांनी सविस्तर



युक्तिवाद मांडताना सांगितले की, आरोपीच्या पिस्तुलातून पाच गोळ्या गायब आहेत. त्यामुळे त्याने पाच नरबळी घेतल्याचा संशय बळावला आहे. तपासादरम्यान आरोपीच्या घराच्या झडतीत अनेक धक्कादायक पुरावे हाती लागले आहेत. यात राजमुद्रा, मालमत्तेची कागदपत्रे, पिस्तूल, यांचा समावेश आहे. तसेच २१ जिवंत काडतुसे आणि ५ वापरलेली काडतुसे देखील जप्त करण्यात आली आहेत. सरकारी वकिलांनी न्यायालयात सांगितले की, आरोपीकडून प्राण्यांची कातडी, पांढरी व काळी कस्तुरी आढळून आली आहे. आरोपी अनेकांना फसवत असल्याच्या तक्रारी वाढत असून पीडित महिलांची संख्या देखील वाढत असल्याचे निदर्शनास आले आहे. तपासासाठी आरोपीने वापरलेले खडे, मिश्रित पाणी, तसेच कस्तुरी कुठून आणली याचा शोध घेणे आवश्यक असल्याचेही सरकारी बाजूने स्पष्ट करण्यात आले. याशिवाय जप्त करण्यात आलेल्या मधील माहिती तपासणे महत्त्वाचे असल्याचे सांगण्यात आले. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने अशोक खरात याला चार दिवसांची पोलीस कोठडी सुनावली असून २९ मार्चपर्यंत त्याची कोठडी वाढवण्यात आली आहे. या प्रकरणातील तपास जसजसा पुढे सरकत आहे, तसतसे आणखी धक्कादायक बाबी समोर येण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

संपूर्ण सृष्टीच्या कल्याणासाठी प्रभु रामचंद्राचे आदर्श सर्वांनीच अंगीकारले पाहिजे >>पान २




# पंतप्रधान मोदींची राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांच्याशी चर्चा; 'होर्मुज'बाबत व्यक्त केली चिंता

**दैनिक आपला विदर्भ**

नवी दिल्ली : पश्चिम आशियामध्ये वाढत्या तणावाच्या दरम्यान भारत आणि अमेरिका यांच्यात उच्च स्तरावर महत्त्वाची चर्चा झाली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्याशी फोनवरून संवाद साधत क्षेत्रातील सध्याच्या परिस्थितीवर चर्चा केली. विशेषतः 'होर्मुजची सामुद्रधुनी' खुली ठेवण्याच्या गरजेवर दोन्ही नेत्यांनी गांभीर्याने विचार विनिमय केला.

अमेरिकन राजदूतांनी दिलेल्या माहितीनुसार, पंतप्रधान मोदी आणि राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांच्यातील संभाषणात पश्र्चिम आशियातील परिस्थिती आणि सागरी सुरक्षेवर भर देण्यात आला. जागतिक व्यापार आणि ऊर्जा पुरवठा विस्कळीत होऊ नये यासाठी होर्मुजची सामुद्रधुनी खुली राहणे आवश्यक असल्याचे दोन्ही नेत्यांनी मान्य केले. इस्रायल-इराण तणावामुळे या भागात अस्थिरता वाढत असतानाच ही चर्चा झाली आहे.

### पंतप्रधान मोदी काय म्हणाले?

चर्चेदरम्यान भारताने तणाव कमी करण्यावर आणि लवकरात लवकर शांतता प्रस्थापित करण्याच्या गरजेवर भर दिला. पंतप्रधान मोदी म्हणाले की, होर्मुजची सामुद्रधुनी खुली, सुरक्षित आणि सुलभ राहणे संपूर्ण जगासाठी अत्यंत आवश्यक आहे. दोन्ही नेत्यांनी या क्षेत्रात स्थिरता आणि शांतता राखण्याच्या प्रयत्नांसाठी एकमेकांच्या संपर्कात राहण्याचे मान्य केले.

### ट्रम्प यांनी केला होता चर्चेचा दावा

या संभाषणाच्या एक दिवस आधी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी दावा केला होता की, अमेरिका आणि इराण यांच्यात चर्चा सुरू असून अनेक मुद्द्यांवर सहमती होण्याची शक्यता आहे. दोन्ही बाजूंना तडजोड हवी आहे आणि जर चर्चा योग्य दिशेने पुढे गेली



तर काही दिवसांतच यावर तोडगा निघू शकतो, असे ट्रम्प म्हणाले होते. ही चर्चेची पुढाकार इराणकडून घेण्यात आली असून अमेरिका केवळ त्याला प्रतिसाद देत असल्याचेही त्यांनी नमूद केले.

### इराणने सर्व दावे फेटाळले

मात्र, इराणने ट्रम्प यांचे हे सर्व दावे पूर्णपणे फेटाळून लावले आहेत. अमेरिकेसोबत कोणतीही चर्चा होत नसल्याचे इराणच्या सर्वोच्च नेत्यांनी स्पष्ट केले. अशा खोट्या बातम्या पसरवून तेल बाजार आणि जागतिक वातावरणावर प्रभाव टाकण्याचा प्रयत्न केला जात आहे, असा आरोप त्यांनी केला. जोपर्यंत आपल्या अटी पूर्ण होत नाहीत, तोपर्यंत चर्चेचा प्रश्र्नच येत नाही, अशी भूमिका इराणने घेतली आहे.

पश्चिम आशिया सध्या अत्यंत तणावपूर्ण टप्प्यातून जात आहे. इराण आणि अमेरिका-इस्रायल यांच्यातील थेट संघर्ष वाढला असून दोन्ही बाजूंनी हल्ले आणि प्रत्युत्तराची कारवाई सुरू आहे. हा संघर्ष आता केवळ मर्यादित लष्करी कारवाईपुरता उरलेला नाही, तर इस्रायल आणि अमेरिकेकडून इराणच्या आत शिरून हल्ले केले जात असल्याने परिस्थिती अधिकच धोकादायक बनली आहे. दुसरीकडे, इराणनेही आखाती क्षेत्र आणि धोरणात्मक ठिकाणांना लक्ष्य करण्याची धमकी दिली आहे. यामुळे संपूर्ण पश्र्चिम आशियामध्ये अस्थिरता पसरली असून अनेक देश 'हाय अलर्ट'वर आहेत. या तणावाचा परिणाम केवळ सुरक्षेवरच नाही, तर जागतिक अर्थव्यवस्थेवरही होत आहे. विशेषतः जगातील तेलाचा मोठा हिस्सा ज्या मार्गावरून जातो, त्या 'होर्मुजच्या सामुद्रधुनी'बाबत चिंता वाढली आहे.

## सुपीकतेवर होतोय थेट परिणाम

सध्या शेतीसमोर एक गंभीर पण दुर्लक्षित प्रश्न उभा ठाकला आहे. पिकांचे उत्पादन वाढवण्याच्या नादात रासायनिक खतांचा बेसुमार वापर होत असल्याने जमिनीचा नैसर्गिक पोत आणि सुपीकता झपाट्याने कमी होत असल्याचे धक्कादायक चित्र समोर येत आहे. जमिनीचा कस कमी होत चालल्याने भविष्यात शेती शाश्वत राहील का? असा प्रश्न आता उपस्थित केला जात असून, कृषी तज्ज्ञांनी यावर तातडीने उपाययोजना करण्याची गरज व्यक्त केली आहे. परिसरातील शेतकऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, गहू, कांदा आणि इतर नगदी पिकांमध्ये अधिक उत्पादनासाठी रासायनिक खतांचा मोठ्या प्रमाणात वापर केला जात आहे. मात्र, यामुळे जमिनीतील सेंद्रिय कर्ब कमी होत असून जमीन निब्बर आणि कडक बनत आहे. जमिनीचा नैसर्गिक भुसभुशीतपणा हरवल्याने पिकांच्या वाढीवर त्याचा विपरीत परिणाम होत आहे. पूर्वी ज्या जमिनीतून शाश्वत उत्पन्न मिळत होते, तिथे आता रासायनिक खतांच्या अधिक मात्रेशिवाय पीक येणे कठीण झाले आहे. जमिनीचा पोत हा पिकांच्या जोमदार वाढीसाठी अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. जमिनीचा पोत बिघडल्यास तिची पाणी धरून ठेवण्याची क्षमता कमी होते आणि पिकांच्या मुळांची वाढ खुंटते. याशिवाय जमिनीतील उपयुक्त सूक्ष्मजीव जसे की, रायझोबियम आणि अझोटोबॅक्टर यांचा ऱ्हास होत असल्याने जमिनीचा जिवंतपणा कमी होत आहे. सूक्ष्मजीवांची संख्या घटल्याने नैसर्गिक खत निर्मितीची प्रक्रियाही मंदावली आहे. आळेफाटा परिसरात खतांचा वापर वर्षागणिक वाढत चालला आहे, मात्र अनेक शेतकरी माती परीक्षण न करताच अंदाजाने खतांचा वापर करत आहेत. परिणामी, जमिनीचा सामू बिघडत असून काही ठिकाणी जमीन आम्लधर्मी तर काही ठिकाणी क्षारधर्मी होत आहे. यामुळे पिकांना आवश्यक पोषकद्रव्यांचे शोषण करणे कठीण जाते आणि घातलेली महागडी खते वाया जातात, ज्यामुळे शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च विनाकारण वाढत आहे. रासायनिक खतांच्या अतिवापराचा परिणाम केवळ जमिनीवरच नाही तर पर्यावरणावरही होत आहे. पावसाच्या पाण्यासोबत ही खते वाहून जाऊन परिसरातील जलस्रोत प्रदूषित होत आहेत. वाढत्या तापमानामुळे जमिनीतील ओलावा कमी होत असून, विषारी बुरशींचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता तुषार डावखर आणि अभिषेक भुजबळ या तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे. यामुळे पिकांवर नवनवीन रोगांचा प्रादुर्भाव होण्याची भीती निर्माण झाली आहे. माती व पाणी परीक्षणाचा अभाव आणि रासायनिक खतांचा अतिरेक यामुळे जमिनीतील सेंद्रिय कर्ब कमी होत आहे, असे मत माती परीक्षक रमेश डुंबरे यांनी व्यक्त केले. तर जमिनीचे आरोग्य टिकवण्यासाठी सेंद्रिय खतांचा, हिरवळीच्या खतांचा वापर वाढवणे आणि संतुलित खत व्यवस्थापन करणे ही काळाची गरज असल्याचे कृषी अधिकारी प्रवीण नंदकुले यांनी स्पष्ट केले आहे.

# उद्धव ठाकरे साहेब यांना खूप खूप शुभेच्छा: एकनाथ शिंदेंनी विधान परिषदेत दिला निरोप; नीलम गोऱ्हे, अमोल मिटकरींचेही केले कौतुक

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्राच्या राजकारणाचं हळवं रुप, एकनाथ शिंदेंकडून उद्धव ठाकरेंचा साहेब असा उल्लेख, दिर्घायुष्याच्या दिल्या शुभेच्छा महाराष्ट्राच्या राजकारणाची एक अनोखी संस्कृती आहे. कितीही राजकीय वैर असलं तरी राजकारणाची पातळी घसरणार नाही याची काळजी राजकीय नेत्यांकडून घेतली जाते. एकनाथ शिंदे आणि उद्धव ठाकरे यांच्यात तीन वर्षांपासून समोरासमोर बोलणं झालेलं नाही. पण उद्धव ठाकरेंचा विधान परिषदेचा कार्यकाळ आता संपत आहे. त्यांच्या निरोप समारंभात एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरेंचा उल्लेख केला. यावेळी त्यांनी उद्धव ठाकरेंना साहेब म्हटलं. तसेच त्यांच्या दिर्घायुष्याच्यादेखील शुभेच्छा दिल्या





शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांच्यासह विधान परिषदेच्या ९ सदस्यांचा कार्यकाळ आता संपतोय. त्यांचा निरोप समारंभ आज विधान परिषदेत पार पडला. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे दोन्ही प्रमुख नेते उपस्थित होते. यावेळी एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांचा साहेब असा उल्लेख केला. तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीदेखील उद्धव ठाकरे यांचं कौतुक केलं. तर एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांना दिर्घायुष्याच्या शुभेच्छा दिल्या.

''सभापती महोदय, आज आपण नावे घेतल्याप्रमाणे ९ सदस्य निवृत्त होत आहेत. विधान परिषदेत अनेक विषयांवर साधकबाधक चर्चा होतात. कधीकधी सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये आरोप-प्रत्यारोप होतात. आज आपण सगळे एका हळव्या वळणावर उभे आहोत. आज या सभागृहातले ९ सदस्य निवृत्त होत आहेत. कितीही टाळलं तरी हे निरोपाचं वळण आपल्याला टाळता येत नाही. निरोप देणाऱ्यांची आणि निरोप घेणाऱ्यांची इच्छा नसली तरी आता थांबा आला असल्याने थांबावच लागतं. मग तो प्रवास असो किंवा विधीमंडळाचा सहवास असो. ज्याचा थांबा आला त्याला थांबावच लागतं'', असं एकनाथ शिंदे म्हणाले.

शिंदेंकडून ठाकरेंचा साहेब असा उल्लेख

''सध्या चैत्र नवरात्र उत्सव आहे. या नवरात्र उत्सवात आपण सभागृहातील ९ सदस्यांना निरोप देत आहोत. ज्यामध्ये उद्धव ठाकरे साहेब आहेत, डॉ. नीलम गोऱ्हे आहेत, अमोल मिटकरी आहेत, शशिकांत शिंदे आहेत, रणजितसिंह मोहिते पाटील, राजेश राठोड, संदीप जोशी, दादाराव केचे आणि संजय केनेकर आहेत. हे आपले ९ सहकारी कार्यकाळ पूर्ण झाल्याने निवृत्त होत आहेत'', असं एकनाथ शिंदे म्हणाले.

''गेल्याच आठवड्यात राज्यसभेतील सभासदांचा निरोप समारंभात देशाचे लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भाषणात सांगितलं होतं की, राजकारणात पूर्णविरा कधीच नसतो. सदस्य राज्यसभेतून निवृत्त झाले तरी त्यांचे जनजीवन संसदेच्या कक्षेबाहेरही निरंतर सुरु असतं. त्याच धर्तीवर विधान परिषदेचं कार्यकाळ आज पूर्ण होणाऱ्या सदस्यांचं कार्यही निरंतर सुरु राहील याची मला खात्री आहे. यापैकी काही सदस्य पुन्हा सभागृहात येतील यासाठी मी शुभेच्छा देतो'', असंही एकनाथ शिंदे म्हणाले.

शिंदेंकडून ठाकरेंना शुभेच्छा

''राज्याचे माजी मुख्यमंत्री आणि सदनाचे सदस्य उद्धव ठाकरे साहेब हे आज विधान परिषदेचा निरोप घेत आहेत, त्यांना निरोगी दिर्घायुष्य लाभो, अशा मनापासून शुभेच्छा देतो. तसेच त्यांना पुढील राजकीय वाटचालीसाठीदेखील खूप खूप शुभेच्छा देतो'', अशा शुभेच्छा एकनाथ शिंदे यांनी दिल्या.

## 'द रिवोल्युशनरीज' फेम प्रतिभा रांटा-रोहित सराफने आपलं नातं लपवलंय? डेटिंगच्या चर्चांना उधाण



### दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** बॉलिवूडचा 'नॅशनल क्रश' रोहित सराफ आणि 'लापता लेडीज'मधून घराघरात पोहोचलेली अभिनेत्री प्रतिभा रांटा सध्या त्यांच्या कथित रिलेशनशिनमुळे चर्चेत आहेत. निखिल अडवाणींच्या 'द रिवोल्युशनरीज' या वेब सीरिजमध्ये हे दोन्ही कलाकार एकत्र काम करत असून, सेटवर त्यांच्यात जवळीकता वाढली का? अनेकदा एकत्र स्पॉट झाल्यामुळे फॅन्सनी त्यांच्या डेटिंगच्या चर्चा सुरु केल्या. अद्याप दोघांनीही अधिकृतपणे प्रेमाची कबुली दिली नसली, तरी सोशल मीडियावरील त्यांच्या 'क्युट' केमिस्ट्रीमुळे ते रिलेशनशिपमध्ये असल्याच्या चर्चांना उधाण आले आहे.

बॉलिवूडमध्ये सध्या एका नव्या जोडीची जोरदार चर्चा रंगली आहे. 'मिसमॅच्ड' फेम चॉकलेट बॉय रोहित सराफ आणि 'लापता लेडीज' फेम प्रतिभावान अभिनेत्री प्रतिभा रांटा एकमेकांना डेट करत असल्याचे म्हटले जात आहे.

भुवन बाम, रोहित सराफ, प्रतिभा रांटा आणि गुरफतेह पीरजादा यांची प्रमुख भूमिका असलेला 'ढहश ठर्शीश्रीींळेपरीळशी' सध्या चर्चेत आहे. या हिंदी वेब सिरीजचे दिग्दर्शन निखिल अडवाणी यांनी केले असून नुकताच या सीरीजचा टीझर रिलीज झाला आहे. आता प्रतिभा रांटा आणि रोहित सराफ हे दोघे पुन्हा एकदा चर्चेत आले आहेत. कारण आहे-डेटिंग. खरंतर दोघांनीही आपल्या नात्याबद्दल उघडपणे सांगितले नसले तरी त्यांच्या फॅन्सनी तर्क-वितर्क लावायला सुरुवात केलीय.

सूत्रांच्या माहितीनुसार, रोहित सराफ आणि प्रतिभा रांटा हे दोघे अनेकदा स्पॉट झाले आहेत. प्रतिभा आणि रोहित सध्या टाईम स्पेंट करत आहेत. ते चांगले मित्र असून गेल्या काही काळापासून दोघांच्या नात्याबद्दल तर्कवितर्क सुरु आहेत. एका पार्टीमध्ये निखिल अडवाणी यांच्यासोबत रोहित आणि प्रतिभा डान्स करतानाचा एक व्हिडिओ देखील सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल झाला होता. ट्विटरवरील ट्विट्सपासून 'रेडिट'वरील दोघांच्या चर्चा होताना दिसल्या आहेत. पण त्यांनी आपल्या नात्याबद्दल कोणीही अद्याप उघडपणे सांगितलेले नाही.

कुठून सुरू झाली ही चर्चा?

या चर्चेची खरी सुरुवात झाली ती निखिल अडवाणींच्या आगामी 'द रिवोल्युशनरीज' या बिग बजेट वेब सीरिजच्या शूटिंगपासून. या सीरिजमध्ये रोहित आणि प्रतिभा मुख्य भूमिकेत आहेत. शूटिंगच्या दरम्यानचे त्यांचे काही पडद्यामागचे व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाले, ज्यामध्ये त्यांची मैत्री आणि एकमेकांसोबतची ट्यूनिंग स्पष्टपणे दिसून येत होती. नुकत्याच प्रदर्शित झालेल्या या सीरिजच्या टीझरमध्येही दोघांच्या अभिनयाचे कौतुक होत आहे.

# संपूर्ण सृष्टीच्या कल्याणासाठी प्रभु रामचंद्राचे आदर्श सर्वांनीच अंगीकारले पाहिजे

चैत्र शुद्ध प्रतिपदा म्हणजे हिंदू धर्माच्या नवीन वर्षाची सुरुवात, या दिवशी गुढी उभारून नवीन वर्षाचे स्वागत मोठ्या उत्साहाने केले जाते.महाराष्ट्रात नवीन वर्ष ''गुढीपाडवा'' म्हणून साजरा केला जातो तर इतर राज्यांत वेगवेगळ्या पध्दतीने हा सण मोठ्या उत्साहाने व आनंदाने साजरा केल्या जातो.याच महीण्यात चैत्र शुद्ध नवमीला श्रीरामाचा जन्म झाला. त्याचप्रमाणे याच महीण्यात सात दिवसांनी महाबली हनुमान यांचा जन्म झाला.म्हणजे चैत्र महिन्यात मर्यादापुरुषोत्तम रामांचा जन्म व महाबली हनुमान यांचा जन्म म्हणजे एक दैवी लीलाच म्हणावी लागेल. यामुळे संपूर्ण भारतात दरवर्षी रामनवमी व हनुमान जन्मोत्सव मोठ्या उत्साहाने व थाटाने साजरी करण्यात येते. रामनवमीला भजन, कीर्तन, पालखी व मोठ-मोठ्या झांक्या काढून संपूर्ण भारतात श्री रामांचा जयघोष दिसून येतो व या दिवशी संपूर्ण माध्यमातून श्रीरामाचे नामस्मरण केल्या जाते. आज जगात ज्या-ज्या ठीकाणी सत्यता व संयमता दिसून येते यामागे मर्यादापुरुषोत्तम प्रभू रामचंद्रांचीच लिला आहे. भारतात बहुसंख्य हिंदू असतांना सुध्दा सर्व धर्मांना घेऊन चालण्याचा मान फक्त भारतीय संस्कृतीमध्येच आहे. कारण संस्कृती,सन्मान,सभ्यता,संयमता, दृढनिश्चयता, आपुलकीची भावना आणि सर्वांना एकत्र घेऊन चालण्याची क्षमता फक्त भारतीय संस्कृतीमध्येच दिसून येते. कारण भारतात सर्वच धर्मांचे लोक एकोप्याने आणि आनंदाने रहातात.त्यामुळे संपूर्ण हिंदु धर्म राममंदिर बांधकामाच्या प्रतीक्षेत होता आणि ते साध्य झाले.त्यामुळे आज आपल्याला अयोध्येत भव्य राममंदिर दिसून येते.आज भारतात हिंदू धर्मामध्ये संयमता दिसून येते ती फक्त प्रभूराचंद्राच्या आशीर्वादानेच.यामुळे विदेशी नागरिकांची जगातील पहीली पसंती भारत असल्याचे दिसून येते.यामागे फक्त प्रभू राचंद्रांचेच आदर्श म्हणावे लागेल व आहे. प्रभूराचंद्राचा आशिर्वाद भारतीयांना आहे. त्यामुळे या धर्तीवर प्रभूश्रीराम सर्वांचेच आहे आणि राहील.कारण अयोध्येत राम जन्मले हे वास्तव्य आहे याची पुष्टी भारतीय पुरातत्त्व विभाग व विदेशातील अनेक पुरातत्त्व विभागाने जाहीर केले आहे.श्री रामाचा जप आपण जन्मा पासून तर शेवटपर्यंत करीत असतो. त्याचप्रमाणे कठीण प्रसंगी रामाचे नामस्मरण करून येणाऱ्या अडचणी व दु:ख दूर करण्यासाठी प्रयत्न करीत असतो. त्यामुळे प्रभूराम सर्वांच्या मनात, हृदयात, आकाश-पाताळ, पुर्व-पश्चिम, उत्तर-दक्षिन,निसर्ग,वन्यप्राणी,मानव-जिवजंतु यांच्या मना-मनात वावरत असतो.त्यामुळेच जगातील इतर देशांच्या तुलनेत प्रत्येक विदेशी नागरिकाची पहीली पसंत भारत असल्याचे दिसून येते. कारण भारतात सर्वच धर्मांच्या देवी-देवतांचा, साधुसंतांचा व थोरमहात्म्याचा वास आहे. त्यामुळे भारतवासी एकोप्याने राहतात.आज जगात भारत विश्व शांतीचे प्रतीक आहे हे फक्त प्रभू राचंद्रांच्या आदर्शामुळे. त्यामुळे प्रभूराचंद्राचे महत्त्व आणि त्यांची लीला हिंदू धर्माला ग्यात आहेच. अयोध्येतील राममंदिर भारतीयांच्या मदतीने एवढे भव्य झाले आहे की त्याची संपूर्ण जगात ऐतिहासिक, सांस्कृतिक, सामाजिक आणि पर्यटनाला चालना देणारे ठीकाण बनलेले आहे.त्याचप्रमाणे सात अजुब्यातुन राममंदिर प्रथम क्रमांकावर असल्याचे मी समजतो.त्यामुळे राममंदिर ते राष्ट्रमंदिर ही भुमिका सर्वांनीच अंगीकारली पाहिजे. त्याचप्रमाणे हिंदूसंस्कृती जोपासण्याकरीता देशातील प्रत्येक हिंदूनी नवनिर्माण अयोध्येतील राम मंदिरात जाऊन रामाचे चरन स्पर्श केलेच पाहिजे.भारतातील प्रत्येक धर्माच्या लोकांनी लक्षात ठेवले पाहिजे की श्रीराम सर्वांचे आहे व राहील. श्रीरामाने १४ वर्षे वनवास भोगला,वालीसारख्या अहंकारी शक्तीचा सर्वनाश केला,रूषि-मुनी,साधु-संत, गोरगरीब यांचे संरक्षण केले,रावनासारख्या असुर शक्तीचा नाश केला तेव्हाच रामराज्याची स्थापणा झाली व सत्ययुग प्रस्तापीत झाले आणि तेव्हापासूनच सर्वांच्या मनात प्रभूराचंद्राची धुंद गुंजतांना दिसते.तीच प्रतीकृती आज अयोध्येमध्ये साकार झाली आहे हे हिंदू धर्माचे अहोभाग्यच म्हणावे लागेल.आज अयोध्येतील राम मंदिरमुळे ''मन में राम,तन मे राम,घर-घर मे राम'' या आवाजाची गुंज आपल्याला संपूर्ण भारतात ऐकायला व पहायला मिळत आहे. आजही जगात अनेक देशांमध्ये हिंदू संस्कृतीची जोपासना केली जाते व हिंदू संस्कृतीचा इतिहास सुध्दा दिसून येतो.यामागचे मुख्य कारण म्हणजे श्रीरामांचे आदर्श आहे.श्रीरामांचा इतिहास आणि वास्तव भारतासह जगातील अनेक देशांमध्ये पहायला मिळते. तेव्हाच प्रभुश्रीरामचंद्रांना मर्यादापुरुषोत्तम म्हटल्या जाते.प्रभु राम सत्यतेचे प्रतीक आहे.त्याचे अनुकरण देशातील लोकप्रतिनिधी, जनप्रतिनिधी स्वयंघोषित समाजसेवक, राजकीय पुढारी यांनी करून जनसेवा करण्याची नितांत गरज आहे.कारण देशातील ९५ टक्के राजकीय पुढारी अहंकारी, स्वार्थीवृत्तीचे असल्यामुळे भ्रष्टाचाराने लिप्त आहेत व मोठ्या प्रमाणात करोडोंची चल-अचल संपत्ती डांबुन ठेवली आहे.या कलयुगात राजकीय पुढारी समाजसेवेपेक्षा स्वतःची सेवा करण्यात मग्न(गुंग)असतात.''मु मे राम बगल में छुरी'' अशा प्रकारची असुरी भावना आजच्या ९५ टक्के राजकीय पुढाऱ्यांत दिसून येते.कारण गरीब व सर्वसामान्यांचे रक्त पीवुन आजचा ९५ टक्के राजकीय पुढारी ''रक्तबीज'' राक्षसाची भुमिका बजावीतांना दिसून येते.त्यामुळेच देशात भ्रष्टाचार व अत्याचार उफाळलेला आहे. आज देशातील प्रत्येक आजी-माजी आमदार-खासदार-मंत्री व अनेक राजकीय पुढारी करोडपती झालेला आहे. यामुळेच आज देशात महागाई, बेरोजगारी, भुकमरी, कुपोषण,महागडे शिक्षण,शेतकऱ्यांच्या समस्या, आरोग्य विषयक समस्या व शेतकऱ्यांच्या आत्महत्यां यांनी जन्म घेतला आहे.मी रामनवमीच्या निमित्ताने देशातील संपूर्ण राजकीय पुढाऱ्यांना, लोकप्रतिनिधी,जनप्रतिनिधी यांना विनंती करतो की रामराज्याची संकल्पना साकार करायची असेल तर आपण वाममार्गाने कमवीलेली व भ्रष्टाचार रूपाने कमविलेल्या संपूर्ण संपत्तीचा त्याग करून सरकारच्या तिजोरीत जमा करावी किंवा जनकल्याणासाठी उपयोगात आणावा यातच खरे प्रभु श्रीराम यांचे आदर्श दिसून येईल. त्याचप्रमाणे भुकेलेल्यांना अन्न हा देवी-देवतांचा मुलमंत्र आजच्या राजकीय पुढाऱ्यांनी अंगीकारला पाहिजे.राजकीय पुढाऱ्यांनी गरिब व सर्वसामान्यांची लुटमार थांबवून आणि महागाई कमी करून समाजकार्य करावे यातच खरा प्रभु रामचंद्राचा आदर्श दिसून येईल व पुन्हा आपल्याला भारतात रामराज्य साकार करता येईल.जोपर्यंत देश भ्रष्टाचारमुक्त होत नाही तोपर्यंत भारतात रामराज्य शक्य नाही.याकरीता भ्रष्टाचारावर आळा व अहंकारी राजकीय पुढाऱ्यांच्या चल-अचल संपत्तीची कठोर चौकशी करून यांची संपत्ती जनकल्याणासाठी उपयोगात आणली पाहिजे. यातच आपल्याला रामराज्य खऱ्या अर्थाने दिसून येईल. आजचा राजकीय पुढारी स्वार्थी झाल्यामुळे व यांच्यात असुरी शक्ती निर्माण झाल्याने देशात अनेक नवीन-नवीन समस्या निर्माण झाल्या आहेत. त्यामुळे देशाच्या १४० कोटी जनतेला आज महागाईचा श्राप बसल्याचे दिसून येते.या असुरी शक्तीला संपवायचे असेल तर प्रभु रामचंद्राचे आदर्श सामोरं ठेऊन राजकीय पुढाऱ्यांनी समाजकार्य करायला हवे.तेव्हाच भारतात रामराज्य प्रस्थापित होईल.रामनवमीच्या पावन दिवसांचे औचित्य साधून संपूर्ण रामभक्तांनी, सामाजिक संघटनांनी, प्रशासनाने व सरकारने आजच्या दिवसाला मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण करून वाढत्या प्रदुषणावर व बदलत्या हवामानावर आवर घालण्यासाठी वृक्षारोपण करून एक आगळावेगळा उपक्रम राबविला पाहिजे.यामुळे निसर्ग प्रफुल्लित होईल व आपल्याला प्रत्येक पानात, फुलात,फळात प्रभु श्रीरामचंद्रांचे दर्शन अवश्य होईल. कारण निसर्गाच्या सान्निध्यातच प्रभु रामचंद्र आहेत. जय श्रीराम!



**लेखक**
**रमेश कृष्णराव लांजेवार**
**(स्वतंत्र पत्रकार )**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## कागलमध्ये गर्भलिंग निदान रॅकेटचा पर्दाफाश; डॉक्टरसह एजंट अटकेत

दैनिक आपला विदर्भ

**कोल्हापूर/प्रतिनिधी :** कागल तालुक्यातील बिद्री येथील श्रद्धा हॉस्पिटलवर स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेच्या पथकाने छापा टाकत अवैध गर्भलिंग निदान प्रकरण उघडकीस आणले आहे. या कारवाईत संबंधित डॉक्टरसह एजंटला अटक करण्यात आली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, श्रद्धा हॉस्पिटलचे डॉ. युवराज पांडुरंग पाटील आणि एजंट संभाजी वसंत शिंदे यांना ताब्यात घेण्यात आले आहे. तसेच या प्रकरणात डॉ. उत्तम सरदेसाई यांची चौकशी सुरू असून, त्यांनाही अटक होण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे.

छाप्यामध्ये अवैधरीत्या वापरले जाणारे सोनोग्राफी मशीन जप्त करण्यात आले. याशिवाय काही वैद्यकीय किट्स आणि संशयास्पद औषधसाठाही हस्तगत करण्यात आला आहे. या प्रकरणात मोठ्या प्रमाणावर आर्थिक व्यवहार झाल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. दरम्यान, डॉ. पाटील यांच्याकडून लाखो रुपयांची रोकड तसेच फॉर्च्युनर कारही जप्त करण्यात आली आहे. विशेष म्हणजे, यापूर्वीही अशा प्रकारचे दोन ते तीन गुन्हे त्यांच्यावर नोंद असल्याची माहिती पोलिसांनी दिली. या प्रकरणी अधिक तपास स्थानिक गुन्हे शाखेकडून सुरू असून, आणखी काही जणांचा यात सहभाग असण्याची शक्यता पोलिसांनी वर्तवली आहे.

## बाळासाहेब ठाकरेंचा ढाण्या वाघ उबाठांमुळे काँग्रेसचा गुलाम - नवनाथ बन

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** बाळासाहेब ठाकरेंच्या वेळचा ढाण्या वाघ आता उद्धव ठाकरे आणि राऊतांच्या कारकीर्दीत वाघाचे कातडे पांघरून काँग्रेसचा गुलाम झाला आहे. खुर्चीसाठी उद्धव सेना काँग्रेसच्या ताटाखालचे मांजर झालेले मतदारांनी पाहिल्यामुळेच, विधानसभा, महापालिका, जिल्हा परिषद निवडणुकांमध्ये उबाठा गटाला मतदारांनी घरी बसवले. राऊतांनी इतरांना मांजर म्हणण्याच्या फंदात न पडता उबाठा गटाचे झालेले मातेरे सावरावे असा घणाघात भारतीय जनता पार्टीचे मुख्य प्रवक्ते नवनाथ बन यांनी मंगळवारी केला. भाजपा प्रदेश कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते.


सातारा जिल्हा परिषद निवडणुकीवेळी जे काही झाले ते हाताळण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि महायुती समर्थ आहे, राऊतांना त्यात नाक खुपसण्याची गरज नाही. लोकशाहीच्या गप्पा राऊतांनी मारूच नये त्यांना तो अधिकारच नाही असे बन यांनी खडसावले. साताऱ्यामध्ये भारतीय जनता पार्टी सर्वाधिक जागांसह सर्वात मोठा पक्ष म्हणून समोर आला असताना काही लोकांनी जाणूनबुजून वेगळ्या पक्षांशी संगनमत करण्याचा प्रयत्न केला. त्यातून हे प्रकरण घडले असे ते म्हणाले.

महायुतीची चिंता करणाऱ्या राऊतांना खडे बोल सुनावत बन म्हणाले की राऊतांनी उबाठा गटातील गटातटाचे राजकारण, उद्धव ठाकरे आणि खुद्द राऊत यांच्यातील संघर्ष मिटवण्याकडे लक्ष द्यावे. ज्यांना स्वत:च्या पक्षातील भांडणे, तंटे, संघर्ष सोडवता येत नाहीत त्यांनी महायुतीच्या अस्तित्वाची चिंता करू नये. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील महायुती भक्कम असून कोणीही त्याला खिंडार पाडू शकत नाही असेही त्यांनी नमूद केले.यावेळी बन म्हणाले की, महायुती सरकार हे ११ कोटी जनतेच्या आशीर्वादामुळे स्पष्ट बहुमताने आलेले सरकार आहे, पाठीत खंजीर खुपसून, विश्वासघात करून आलेल्या मविआ सरकारसारखे नाही. मविआ सरकार वाचवण्यासाठी उद्धव ठाकरे, राऊतांना सचिन वाझे तसेच अनेक अट्टल गुन्हेगारांना पाठीशी घालावे लागले होते. महायुती सरकार भरभक्कम असून सरकार टिकवण्यासाठी कुणालाही पाठीशी घालण्याची गरज भासत नाही.

# धनगर आरक्षणासाठी टॉवरवर चढून आंदोलन; गजानन बोरकर ठाम

दैनिक आपला विदर्भ





**मेहकर/प्रतिनिधी :** धनगर समाजाच्या एसटी प्रवर्गातील आरक्षणाच्या मागणीने पुन्हा एकदा बुलढाणा जिल्ह्यात तीव्र रूप धारण केले आहे. जानेफळ येथे आंदोलक गजानन बोरकर यांनी मंगळवार (२४ मार्च) रोजी सकाळी साडेनऊ वाजता मोबाइल टॉवरवर चढून 'शोले स्टाईल' आंदोलन सुरू केले. मागण्या पूर्ण होत नाहीत तोपर्यंत खाली उतरणार नसल्याचा पवित्रा त्यांनी घेतला आहे.

धनगर समाजाला एसटी प्रवर्गातून आरक्षण मिळावे, ही मागणी गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे. शासनाकडून केवळ आश्वासने मिळत असून प्रत्यक्षात कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याचा आरोप समाज बांधवांकडून करण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर १६ मार्चपासून मुंबईतील आझाद मैदान येथे दीपक बोराडे यांनी उपोषण सुरू केले असून त्यांची प्रकृती खालावत असल्याची माहिती आहे.

या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी गजानन बोरकर यांनी जानेफळ येथे टॉवरवर चढून आंदोलन छेडले आहे. त्यांच्या या भूमिकेमुळे परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले असून मोठ्या संख्येने समाजबांधव जानेफळकडे गर्दी करत आहेत. दरम्यान, आंदोलनस्थळी आज महसूल प्रशासन व पोलीस प्रशासनातील अधिकारी व कर्मचारी यांनी भेट देऊन गजानन बोरकर यांना समजावण्याचा प्रयत्न केला. मात्र, बोरकर हे आपल्या मागणीवर ठाम राहिले असून आंदोलन सुरूच ठेवण्याचा निर्णय त्यांनी कायम ठेवला आहे.

यापूर्वीही बोरकर टॉवरवर चढल्याची माहिती मिळताच प्रशासनाने तात्काळ घटनास्थळी धाव घेतली होती. जानेफळ पोलिस ठाण्याचे अधिकारी, मेहकरचे तहसीलदार नीलेश मडके व अप्पर तहसीलदार यांनी घटनास्थळी भेट देत बोरकर यांना खाली उतरण्याची विनंती केली होती. मात्र, मुंबईतील आंदोलनाची दखल घेतली जाईपर्यंत आंदोलन मागे घेणार नसल्याचे बोरकर यांनी स्पष्ट केले. या घटनेमुळे धनगर आरक्षणाचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून शासन काय भूमिका घेते, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

# जळव घाटात पिकअपचा भीषण अपघात; १ ठार, १२ जखमी

दैनिक आपला विदर्भ

**सातारा/प्रतिनिधी :** सातारा जिल्ह्यातील पाटण तालुक्यात जळव घाटात आज सकाळी सुमारे अकरा वाजण्याच्या सुमारास पिकअप वाहनाचा भीषण अपघात झाला. ज्योतिबा दर्शनासाठी निघालेल्या भाविकांच्या वाहनाला घाटातील वळणावर अपघात झाल्याने एक जण ठार झाल्याची प्राथमिक माहिती असून तब्बल १२ जण जखमी झाले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, अपघातातील जखमींना तात्काळ रुग्णवाहिकेद्वारे तारळे तसेच सातारा येथील रुग्णालयात






उपचारासाठी हलविण्यात आले आहे. जखमी सर्वजण कोरेगाव तालुक्यातील हिवरे गावातील असल्याचे समोर आले आहे.

घाटातील धोकादायक वळणावर चालकाचा ताबा सुटल्याने हा अपघात झाल्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. अपघाताचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. घटनेची माहिती मिळताच स्थानिक पोलीस व प्रशासन घटनास्थळी दाखल झाले असून पुढील तपास सुरू आहे. या अपघातामुळे जळव घाट परिसरात काही काळ वाहतूक विस्कळीत झाली होती. या भीषण घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात असून जखमींवर तातडीने उपचार सुरू आहेत.

## अहिल्यानगर जिल्ह्यात टँकरमधून गॅस चोरीप्रकरणी कारवाई – राज्यमंत्री कदम

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** अहिल्यानगर जिल्ह्यातील केडगाव बायपास रोडवर टँकरमधून गॅसची चोरी करून अनधिकृत साठा करण्याच्या प्रकरणात पोलिसांनी मोठी कारवाई केली असून दोषींवर कडक कारवाई करण्यात आली आहे, अशी माहिती राज्यमंत्री योगेश कदम यांनी विधानसभेत दिली. आमदार संजय पोतनीस यांनी या संदर्भात प्रश्न उपस्थित केला होता.

राज्यमंत्री योगेश कदम यांनी सांगितले की, पोलिसांना मिळालेल्या माहितीनुसार शोधमोहीम राबवण्यात आली. संबंधित टँकर पुण्यातून–छत्रपती संभाजीनगरकडे जात असताना, वाहतुकीदरम्यान काही टँकर चालक गॅसची जाणीवपूर्वक गळती करून त्याची चोरी करत असल्याचे निदर्शनास आले. हा चोरी केलेला गॅस काही ठिकाणी थांबून अनधिकृतरित्या सिलिंडरमध्ये भरला जात होता. या प्रकरणात दोषींवर कारवाई करण्यात आली आहे. ज्या ठिकाणी अशा प्रकारचे व्यवहार सुरू होते, त्या सर्व ठिकाणांवर छापे टाकून गुन्हे नोंदविण्यात आले आहेत.

# छत्रपती संभाजीनगरमध्ये भीषण आग; गोदामातील लाखोंचा माल जळून खाक

दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** : महाराष्ट्रातील छत्रपती संभाजीनगर येथे भीषण आगीची घटना घडली आहे. शहरातील गोळवली संकुलातील एका गोदामाला अचानक आग लागल्याने परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले. आगीच्या प्रचंड ज्वाळा आणि धुराचे लोट अनेक किलोमीटरपर्यंत दिसत होते.

या गोदामात मोटारसायकल आणि कारचे मोठ्या प्रमाणात साहित्य साठवलेले होते. त्यामुळे आग काही क्षणातच भडकली आणि संपूर्ण गोदामाने पेट घेतला. या आगीत लाखोंचा माल जळून खाक झाला आहे.

घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाने तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. संभाजीनगर महापालिकेच्या आठ आणि एमआयडीसीच्या दोन अशा एकूण दहा अग्निशमन गाड्यांनी मिळून आग विझवण्याचे काम हाती घेतले. सुमारे दोन तासांच्या अथक प्रयत्नांनंतर आगीवर पूर्णपणे नियंत्रण मिळवण्यात यश आले.

दरम्यान, खबरदारीचा उपाय म्हणून संपूर्ण परिसर रिकामा करण्यात आला होता. घटनेची माहिती मिळताच महापालिका आयुक्त जी. श्रीकांत यांनी घटनास्थळी भेट देऊन परिस्थितीचा आढावा घेतला. या दुर्घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नसल्याने मोठा दिलासा मिळाला आहे.

सध्या नुकसानीचा पंचनामा सुरू असून, आगीचे नेमके कारण शोधण्याचे काम सुरू आहे. वाढत्या उष्णतेमुळे अशा घटना वाढत असल्याने नागरिकांनी अग्निसुरक्षेच्या उपाययोजना करण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे.



## शब्दकोडे क्र. 90

आडवे शब्द

१. अचूक उपाय (ला.) ४. दोघे ७. परीक्षा करण्यात नापास! ११. अपेक्षित वेळेनंतर १२. धार लाव! १३. अटीची भाषा १४. मनात उठणारे वादळ १५. आपल्या डोक्यावरची निळी छत्री १८. खोडसाळ, वात्रट २०. पिकाचा गाळ २२. प्राण्यांसाठी एक ज्ञानेंद्रियच २३. वेगळाच इतिहास रचणाऱ्या बिहारच्या माजी मुख्यमंत्री २४. अस्वल २५. अल्प २७. 'जैसे थे' परिस्थिती २९. मरेपर्यंत ३१अ. दबाव ३२. लहान ३३. संगीतातील एक राग ३५. हार, सर ३६. वस्ती ३८. भांडणाची कळ ३९. कलावंत ४१. देशाचे नाणे ४२. आजूबाजूच्या परिस्थितीप्रमाणे रंग बदलणारा ४३. मार्गक्रमण ४५. त्वरेने, तत्परतेने ४७. नूतन ४८. नाश पावणारे ५०. आवाजाची गोंधळ ५१. विशेष ५३. मोत्याची पैदास करणारा प्राणी ५४. पुन्हा पुन्हा ५७. बाई ५८. मद्य ६०. जुगाराचा एक प्रकार ६१. थेट, सरळ ६३. शुष्कता, तीव्र ऊन ६४. शहाणा, सुंदर ६७. वडील ६९. राख ७२. व्याकूळ, घाबरलेला ७४. पेढ्याचा एक प्रकार ७५. कणीदार ७६. विखारी चेष्टा ७७. शिक्षा

उभे शब्द

१. श्रीमंत बाजीराव पेशवे यांचे घरगुती संबोधन २. शाहिरी मराठीत 'माझ्याबरोबर' ३. नेमका तपशील ४. छाती ५. देवाचे असेल तर ठीक! ६. लकेर ७. समुद्रातील लाटांचा आवाज ८. भरजरी ९. रममाण, निमग्न १०. कबूतर १२. एक पंजाबी नाव १६. ऐन १७. चिडवण्यासाठी केलेले कृत्य १९. सर्वस्व २१. लेखक मतकरींचे नाव २४अ. फळांचे पेय २५. दोस्त २६. शरीर २८. पाताळ २९. शिव्याशाप ३०. अंकित माणूस, गुप्तहेर ३१. शक्ती, जोर, बळ ३१अ. लाही-लाही ३३. हिमालयातील पांडवकालीन सरोवर ३४. वेडावाकडा ३५. खाणाखुणांवरून पाठलाग ३७. उंट हाकणारा ४०. पापडाच्या पिठाची गोळी ४१. हालचाल ४४. पृष्ठभागावरील निघालेला छोटा तुकडा ४५. पटापटा ४६. '––– काय अन् फाटक्यात पाय!' ४९. पाठविलेला ५०. ऋणको, कर्ज घेणारा ५१. फुकटचंबूमुळे पदराला लागणारा लोणच्यातील मसाला ५२. सदोदित ५५. वर्तमानपत्रातील कप्पा ५६. वेतन ५९. न केलेल्या गोष्टींचा पाश्चाताप ६०. महिरप ६२. पशूंचे ओरडणे ६५. विष ६६. सजावट ६७. विहीर ६८. माहूताकडील शस्त्र ७०. मीठ ७१. पलंग, बाज ७३. वाजवण्याची पेटी, फजितीचे वाद्य


### शब्दकोडे क्र. 89 चे उत्तर

आडवे उत्तर

१.छाना २अ.बेभान ५.पथकर ८.वसवस ११.कट १२.जरतर १४.सामानसुमान १५.टाकला १७.लकवा १९.रास २१.लवाद २३.वारदार २४.मांजर २५.अस्त २६.सरकार २८.नीरजा ३१.मस ३३.समरस ३४.खत ३५.सारजा ३६.समाचार ३७.वात ३८.कलह ४०.नशा ४२.दाढी ४३.नवरस ४५.वातड ४६.किन्नर ४७.पीर ४८.नाक ४९.मौज ५०.खानसामा ५३.कलकल ५४.मानधन ५६.खनन ५८.तनया ६०.दादर ६२.रदन ६४.तगडा ६७.रया ६८.वानर ७०.अनारकली ७२.वाजतगाजत ७४.तीखा ७५.वासरू ७७.सजा ७८.गजरा ८०.नाद ८२.सरळसोट ८३.मनकवडा ८४.तर्री

उभे उत्तर

१.छाकटा २.नरम ३.भाजणी ४.नर ५.परकर ६.कसा ७.रमावर ८.वसुधा ९.समा १०.वनराज १३.तलवार १६.ताल १८.वासर २०.सरबत २२.वास २४.मांजा २५.अचानक २७.कास २८.नीरद २९.रस ३०.वसाहत ३२.कमालकिमान ३३.सरदार ३४.खतरनाक ३७.वाव ३९.लवाजमा ४१.शासन ४३.नरकयातना ४४.सकल ५०.खानदान ५१.साखर ५२.पतन ५५.नफा ५७.नर ५९.अरण्यवास ६१.दरवाजा ६३.दहेज ६५.गरती ६६.डाकखाना ६९.मतदान ७१.वारूळ ७३.तगडा ७६.सर ७७.सट ७९.रात ८१.दरी



वृत्तविशेष...

## शेगाव तालुक्यातील रिक्त ग्रामपंचायत सदस्य पदांसाठी पोटनिवडणूक जाहीर

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी :** राज्य निवडणूक आयोगाकडून घोषीत केलेल्या निवडणूक कार्यक्रमानुसार शेगाव तालुक्यांतील पाच ग्रामपंचायतींच्या रिक्त थेट सरपंच व सदस्यांच्या पोट निवडणूकीचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. यामध्ये येऊलखेड, चिंचखेड, सगोडा, टाकळी व धारवला मुरा असे पाच रिक्त ग्रामपंचायत सदस्य पदाच्या जागासाठी निवडणूक होणार आहे. या ग्रामपंचायतींमध्ये आचारसंहिता लागू असून निवडणूक आचारसंहितेचे काटेकोर पालन करावे, असे आवाहन शेगाव तहसिलदार तथा ग्रामपंचायत निवडणूक अधिकारी यांनी केले आहे.

निवडणूक कार्यक्रम याप्रमाणे : निवडणूकीची अधिसूचना सोमवार दि. ३० मार्च २०२६ रोजी संबधित तहसिल कार्यालय व ग्रामपंचायत कार्यालयाच्या सूचना फलकावर प्रसिद्ध करण्यात येईल. या कार्यक्रमानुसार निवडणुकीकरीता नामनिर्देशनपत्र दि. ७ ते १३ एप्रिल २०२६ पर्यंत सकाळी ११ वाजेपासून ते दुपारी ३ वाजेदरम्यान स्वीकारले जाणार आहे.

नामनिर्देशन पत्र छाननी बुधवार दि. १५ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ११ वाजूपासून छाननी संपेपर्यंत. दि. १७ एप्रिल २०२६ रोजी नामनिर्देशन अर्ज मागे घेण्याची अंतिम मुदत ठेवण्यात आली आहे. या निवडणूकीचे मतदान मंगळवार दि. २८ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ७.३० ते सायं ५.३० वाजेपर्यंत होणार असून मतमोजणी बुधवार दि. २९ एप्रिल २०२६ रोजी करण्यात येणार आहे, असे प्रसिद्धी पत्रकाव्दारे कळविले आहे.

## सावत्र आईकडून मारहाण होत असलेल्या बालिकेची सुटका; चाईल्ड हेल्प लाईन व पोलिसांची संयुक्त कारवाई

**बुलढाणा/प्रतिनिधी :** मलकापूर येथील वरखेड गावात सावत्र आईकडून मारहाण होत असलेल्या १४ वर्षीय बालिकेची चाईल्ड हेल्प लाईन १०९८, जिल्हा बाल संरक्षण कक्ष व मलकापूर ग्रामीण पोलिसांनी संयुक्त कारवाई करत सुटका केली. दि. २२ मार्च २०२६ रोजी या घटनेची माहिती चाईल्ड हेल्प लाईनला प्राप्त होताच प्रकल्प समन्वयक शेख सोहेप यांनी तातडीने दखल घेतली. त्यांनी जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी अमोल डिघुळे, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी दिवेश मराठे तसेच बाल कल्याण समिती यांना माहिती देऊन त्यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील कार्यवाही सुरू केली. यानंतर चाईल्ड हेल्प लाईनच्या पथकाने वरखेड येथे भेट देऊन चौकशी केली असता संबंधित बालिकेला सावत्र आईकडून मारहाण होत असल्याचे निष्पन्न झाले. परिस्थितीची गंभीरता लक्षात घेऊन तात्काळ मलकापूर ग्रामीण पोलीस स्टेशनला कळविण्यात आले.

चाईल्ड हेल्प लाईनच्या पथकाने बालिकेसह तिच्या मोठ्या भावाला ताब्यात घेऊन पोलिस स्टेशनमध्ये आणले. पोलिसांनी चौकशी करून संबंधित सावत्र आईविरुद्ध गुन्हा दाखल केला. तसेच बालिकेची वैद्यकीय तपासणी करण्यात आली. बालिकेला बाल कल्याण समितीसमोर हजर करण्यात आले असता, समितीच्या आदेशानुसार तिला संरक्षण व काळजीच्या दृष्टीने सखी वन स्टॉप सेंटर, बुलडाणा येथे दाखल करण्यात आले. यानंतर चाईल्ड हेल्प लाईनच्या समुपदेशकांनी बालिकेचे समुपदेशन केले. सदर प्रकरणाची पुढील कार्यवाही बाल कल्याण समिती, बुलडाणा यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

## माजलगाव वाळू तस्करी प्रकरणाची गंभीरता लक्षात घेऊन सखोल चौकशी करण्यात येईल – मुख्यमंत्री

**मुंबई/प्रतिनिधी :** बीड जिल्ह्यातील माजलगाव येथे कथित पोलिसांच्या संगनमतातून सुरू असलेल्या वाळू तस्करी प्रकरणात तीन संशयित व्यक्तींचे मोबाईल जप्त करण्यात आले होते. या मोबाईलमधील डिलीट केलेला डेटा देखील अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने पुनर्प्राप्त करण्यात आला आहे. मात्र, या सर्व डेटाच्या विषणानंतरही संबंधितांमधील थेट संगनमत किंवा परस्पर संबंध सिद्ध करणारे ठोस पुरावे मिळाले नाहीत. तरीही या प्रकरणाची गंभीरता लक्षात घेऊन सर्व संभाव्य बाबींची सखोल चौकशी करण्यात येईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत सांगितले.

बीड जिल्ह्यातील माजलगाव येथे पोलिसांच्या संगनमताने वाळू तस्करी सुरू असल्याबाबत सदस्य प्रकाश (दादा) सोळंके यांनी प्रश्न उपस्थित केला. या चर्चेत सदस्य नाना पटोले, अर्जुन खोतकर यांनी सहभाग घेतला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, राज्यात लोकल क्राइम ब्रँच (एलसीबी) तसेच गुन्हे अन्वेषणासाठी विशेष पथके कार्यरत असून, विविध प्रकारच्या गुन्ह्यांवर प्रभावी नियंत्रण ठेवण्यासाठी ही यंत्रणा सातत्याने काम करत आहे. काही ठिकाणी गैरव्यवहारांच्या तक्रारींचा विचार करून संबंधित अधिकाऱ्यांच्या नियुक्तीसाठी निकष निश्चित करण्यात आले असून त्याची काटेकोर अंमलबजावणी केली जात आहे. यावेळी राज्यमंत्री योगेश कदम यांनी माहिती दिली की, या प्रकरणात भ्रष्टाचार प्रतिबंधक विभागामार्फत (एसीबी) कारवाई करण्यात आली असून संबंधित हवालदाराला निलंबित करण्यात आले आहे. जप्त मोबाईलचा फॉरेन्सिक अहवाल नुकताच प्राप्त झाला असून त्यात आरोपी व पोलीस निरीक्षक यांच्यात आक्षेपार्ह संभाषण आढळलेले नाही.तपासाच्या पार्श्वभूमीवर संबंधित पोलीस निरीक्षकाला नियंत्रण कक्षात संलग्न करण्यात आले होते, जेणेकरून चौकशीवर कोणताही प्रभाव पडू नये. अहवालानंतर त्याचा सहभाग नसल्याचे स्पष्ट झाल्याने त्याची पुन्हा बदली करण्यात आल्याचेही राज्यमंत्री कदम यांनी यावेळी सांगितले.

# दुर्गबोरी विकासापासून कोसो दूर; नागरिक त्रस्त, प्रशासन सुस्त

## रस्ता, पाणी व घरकुल प्रश्नांवर ग्रामस्थ आक्रमक; निवडणुकांवर बहिष्काराचा इशारा









**दैनिक आपला विदर्भ**

**मेहकर/प्रतिनिधी :** मेहकर तालुक्यातील दुर्गबोरी येथील ग्रामस्थांनी मूलभूत सुविधांच्या अभावामुळे संतप्त होत प्रशासनाच्या निष्क्रियतेविरोधात तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. रस्ता, पिण्याचे पाणी व घरकुल यांसारख्या महत्त्वाच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप करत गावकऱ्यांनी येणाऱ्या प्रत्येक निवडणुकीवर बहिष्कार टाकण्याचा इशारा दिला आहे.

याबाबत भारत मुक्ती मोर्चा व राष्ट्रीय आदिवासी एकता परिषद यांच्या वतीने २३ मार्च रोजी बुलडाणा जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन सादर करण्यात आले. निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, मेहकरहून दुर्गबोरीकडे येणारा लोणी गवळी ते दुर्गबोरी दरम्यानचा रस्ता अत्यंत खराब झाला असून तात्काळ डांबरीकरण करण्याची मागणी करण्यात आली आहे. या रस्त्यामुळे वाहनचालक, पादचारी व विशेषतः रुग्णांना मोठा त्रास सहन करावा लागत असल्याचे ग्रामस्थांनी सांगितले.

तसेच गावात पिण्याच्या पाण्याची गंभीर टंचाई निर्माण झाली आहे. पेयजल योजनेअंतर्गत पाण्याच्या टाकीचे केवळ कॉलम उभे करण्यात आले असून प्रत्यक्षात पाणीपुरवठा सुरू झालेला नाही. त्यामुळे ग्रामस्थांना पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे. याशिवाय शबरी आवास योजनेंतर्गत मंजूर घरकुल लाभार्थ्यांना अद्याप अनुदान मिळाले नसल्याने बांधकाम रखडले आहे. या सर्व प्रलंबित प्रश्नांची तात्काळ सोडवणूक करण्यात यावी, अन्यथा येणाऱ्या सर्व निवडणुकांवर गावकरी बहिष्कार टाकतील, असा इशारा निवेदनातून देण्यात आला आहे.

निवेदन देताना भारत मुक्ती मोर्चाचे भागवत जाधव, राष्ट्रीय आदिवासी एकता परिषदेचे नागेश डाखोरे यांच्यासह संजय धुरंधर, नितीन हिवाळे, सुनील गवई, संगिता मोहोड, संध्याताई हिवाळे, अमोल डाखोरे, रामेश्वर कांबळे, संतोष जाधव, उल्हास शेळके, प्रमोद शिंदे, शालिग्राम डाखोरे, नितीन अंभोरे, कृष्णा चवरे, कृष्णा करवते, ओम करवते, पवन डाखोरे, जगदीश लठाड, दीपक अंभोरे, सुनील डाखोरे, गणेश चवरे यांच्यासह असंख्य ग्रामस्थ उपस्थित होते.

## लाखाळा येथील शिव गोरखनाथ संस्थानात श्रीमद् देवी भागवत कथा ज्ञानयज्ञ सांगता व महाप्रसाद

**दैनिक आपला विदर्भ**

**वाशिम/प्रतिनिधी :** शहरातील लाखाळा परिसरातील शिव गोरखनाथ संस्थान येथे परमपूज्य मठाधिपती श्री शंकरनाथजी महाराज यांच्या कृपाशीर्वादाने श्रीमद् देवी भागवत कथा ज्ञानयज्ञ सप्ताहाचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. गुरुवार, १९ मार्च २०२६ पासून या सप्ताहास मोठ्या उत्साहात आणि भक्तीमय वातावरणात सुरुवात झाली आहे. श्रीधाम वृंदावन व देवाची आळंदी येथील सुप्रसिद्ध कथा वाचक व प्रवक्त्या परम श्रद्धेय वनिताश्रीजी गात यांच्या सुमधुर वाणीतून भाविकांना देवी भागवत कथेचे श्रवण करण्याची पर्वणी मिळत आहे. या

### २५ मार्च रोजी काल्याचे कीर्तन आणि भव्य महाप्रसादाचे आयोजन

पवित्र ज्ञानयज्ञ सप्ताहाचे यजमानपद श्री विष्णू (माऊली) बाजड आणि सौ. गायत्री विष्णू बाजड हे भूषवित आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली व नियोजनाखाली हा सोहळा पार पडत आहे.

**२५ मार्च रोजी सप्ताहाची सांगता**

या भागवत सप्ताहाची सांगता बुधवार, दिनांक २५ मार्च २०२६ रोजी होणार आहे. सप्ताहाच्या शेवटच्या दिवशी परंपरेनुसार काल्याचे कीर्तन संपन्न होईल. विशेष म्हणजे, हे काल्याचे कीर्तन स्वतः कथा वाचक परम श्रद्धेय वनिताश्रीजी गात या करणार असून, भाविकांसाठी हा एक विशेष पर्वणीचा क्षण असणार आहे.

**भव्य महाप्रसादाचे आयोजन**

सप्ताहाच्या सांगतेनिमित्त बुधवार, २५ मार्च रोजी दुपारी १२ ते सायंकाळी ५ या वेळेत भव्य महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. तरी शहरातील व परिसरातील जास्तीत जास्त भाविकांनी या ज्ञानयज्ञ सप्ताहात सहभागी होऊन कथेचा, काल्याच्या कीर्तनाचा आणि महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजक बाजड परिवार व शिव गोरखनाथ संस्थानच्या वतीने करण्यात आले आहे.

## सायबर अटॅकपासून वाचण्यासाठी दक्ष राहणे आवश्यक – सायबर तज्ज्ञ हिमांशु जोशी

**नागपूर/प्रतिनिधी :** इंटरनेट व मोबाईल वापरताना दैनंदिन जीवनात घडणारे सायबर गुन्हे, त्याचे विविध प्रकार, त्यापासून वाचण्यासाठी घ्यायची काळजी याबाबत सविस्तर म ार्गदर्शन करत अशा सायबर अटॅकच्या जाळ्यात सापडल्यास घाबरुन न जाता यातून सुखरूप बाहेर येता येते, असा विश्वास आज सायबर तज्ज्ञ हिमांशु जोशी यांनी कार्यशाळेत व्यक्त केला.

माहिती व जनसंपर्क म हासंचालनालयाच्या नागपूर-अमरावती विभागाच्या संचालक कार्यालयात 'सायबर गुन्हे' विषयावर कार्यशाळा आयोजित करण्यात आली. त्यावेळी मार्गदर्शन करताना श्री. जोशी बोलत होते. संचालक डॉ. गणेश मुळे अध्यक्षस्थानी होते.

हिमांशु जोशी यांनी सायबर गुन्हे हा विषय समजावून सांगताना डाटा हॅकिंग कशा प्रकारे करण्यात येते व त्यासाठी होणारा डाटाचा उपयोग विविध दैनंदिन उदाहरणांद्वारे समजावून सांगितला. डिजिटल फुटप्रिंटच्या माध्यमातून सम ाज माध्यमांवर वापरकर्त्याद्वारे सर्च करण्यात येणारी माहिती देताना त्यांनी सांगितले की, जेंव्हा आपल्या मोबाईल किंवा इंटरनेटचा स्पीड कमी होतो व हे डिव्हाईस गरम होतात तोच तुमचे डिव्हाईस हॅक होण्याचा संकेत असतो.

सायबर बुलिंग, सोशल मिडिया फ्रॉड, डेटा थेफ्ट, फिशिंग आदी सायबर फ्रॉडच्या प्रकाराविषयी त्यांनी माहिती दिली. पासवर्ड कसे ठेवावे. क्यूआर कोड द्वारे व्यवहार करताना घ्यावयाची काळजी, सार्वजनिक स्थळावरील वायफाय द्वारे होणारे हॅकिंग समजावून सांगताना सार्वजनिक स्थळावरील वायफायचा वापर टाळण्याचा सल्ला त्यांनी दिला.

कॉल मर्जिंग स्कॅम, लॉट्री स्कॅम, ऑनलाईन शॉपिंग स्कॅम, कस्टमर केअर स्कॅम याविषयी त्यांनी उदाहरणासहीत माहिती दिली. फेसबुक, व्हाट्सअप आणि इंस्टाग्राम वापरताना होणारी डाटा चोरी त्यांनी समजावून सांगितली.

सायबर अटॅक पासून असा होईल बचाव

समाज माध्यमांवर बरेचदा चुकीची बातमी पसरवून लोकांमध्ये संभ्रम निर्माण केला जातो, त्याला फेक न्युज म्हणतात. कोणती बातमी ही फ ेक न्यूज आहे हे ओळखण्यासाठी pibfactcheckunit (https://www.pib.gov.in/aboutfactchecke.aspX?reg-3&lang-2) या संकेतस्थळावर ती बातमी अपलोड करून त्याची सत्यता पटते असे त्यांनी सांगितले. सर्वसामान्यांचा डेटा कुठे वापरल्या जातो यासाठी https://haveibeenpwned.com/ या संकेतस्थळाद्वारे माहिती कळते.

डेटा शेअरचा धोका टाळण्यासाठी Google password manager (https://passwords.google.com/?pli-1) चा वापर करण्याचा सल्ला त्यांनी दिला. एसएमएस व व्हाट्सअपद्वारे येणाऱ्या विविध लिंक योग्य की अयोग्य हे तपासण्यासाठी. virus total.com (https://www.virustotal.com/gui/home/upload) या संकेतस्थळाचा वापर करावा असा सल्लाही त्यांनी दिला.

तत्पूर्वी, संचालक डॉ. गणेश मुळे यांनी प्रास्ताविकात सायबर गुन्हे विषय कार्यशाळे मागील उद्देश स्पष्ट केला. रोज वर्तमानपत्रात सायबर गुन्ह्याबाबत येणाऱ्या बातम्या व त्यातून होणारे फ्रॉड पाहता कार्यालयातील अधिकारी – कर्मचारी यांना या विषयाबाबत माहिती असावी. या माध्यमातून त्यांच्या संपर्कात येणारे त्यांचे नातेवाईक व मित्र यांचीही सुरक्षा होईल, असे त्यांनी सांगितले.

मुख्यमंत्री कार्यालयाचे प्रसिद्धी समन्वयक अनिल गडेकर यांनी सायबर तज्ज्ञ हिमांशु जोशी यांचा परिचय करून दिला तर सहाय्यक संचालक पल्लवी धारव यांनी आभार मानले.

## बुलडाणा येथे उन्हाळी क्रीडा व व्यक्तिमत्व विकास शिबीराचे आयोजन

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी :** जिल्ह्यातील खेळाडू घडावेत, त्यांच्या कौशल्यांना वाव मिळावा आणि विद्यार्थ्यांमध्ये खेळाविषयी आवड निर्माण व्हावी, या उद्देशाने क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, बुलडाणा यांच्या वतीने उन्हाळी क्रीडा प्रशिक्षण व व्यक्तिमत्व विकास शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे.

हे शिबीर दि. १ एप्रिल ते २५ एप्रिल २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात येणार असून सकाळी ६ ते ८ आणि सायंकाळी ५.३० ते ७.३० या दोन सत्रांमध्ये प्रशिक्षण दिले जाईल. जिल्हा क्रीडा संकुल, जिजामाता क्रीडा व व्यापारी संकुल, तालुका क्रीडा संकुल (धाड नाका शेरीवेल) तसेच एडेड हायस्कूलचे मैदान या ठिकाणी शिबीर होणार आहे. शिबीराचा शुभारंभ दि. १ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजता जिजामाता क्रीडा व व्यापारी संकुल, बुलडाणा येथे होणार आहे.

या शिबिरात मैदानी खेळांसह आर्चरी, हँडबॉल, कबड्डी, खो-खो, फुटबॉल, बॉक्सिंग, जिम्नॅस्टिक्स आदी विविध खेळांचे आधुनिक आणि तंत्रशुद्ध प्रशिक्षण दिले जाणार आहे. राज्य क्रीडा मार्गदर्शक, तसेच जिल्ह्यातील आजी-माजी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय खेळाडू यांचे मार्गदर्शन लाभणार आहे.

८ ते १७ वयोगटातील विद्यार्थी (मुले व मुली) या शिबिरात सहभागी होऊ शकतात. मात्र ८ ते १४ वयोगटाला प्राधान्य दिले जाणार आहे. या प्रशिक्षणामुळे विद्यार्थ्यांच्या शारीरिक क्षमतेत वाढ होऊन त्यांचे आरोग्य सुदृढ राहण्यास मदत होईल. यासोबतच व्यक्तिमत्व विकासासाठी चित्रकला, योगा, एरोबिक्स, लाठी-काठी, क्रीडा दुखापत व प्रथमोपचार, तसेच आहार विषयक मार्गदर्शन तज्ञांकडून दिले जाणार आहे.

हे शिबीर पूर्णपणे विनामूल्य असून नियमित उपस्थित राहणाऱ्या खेळाडूंना प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. इच्छुकांनी ऑनलाईन नोंदणी करावी तसेच अधिक माहितीसाठी उज्वला लांडगे (मो. ९७६४७३२७६८) व जीवन मोहड (मो. ९४०५७३४४०३) यांच्याशी संपर्क साधावा.

## क्षयरोगमुक्त जिल्ह्यासाठी सर्वांनी पुढाकार घ्यावा -मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी :** क्षयरोग हा पूर्णपणे बरा होऊ शकणारा आजार असून वेळेवर निदान आणि योग्य उपचार घेतल्यास रुग्ण पूर्णपणे निरोगी होऊ शकतो. क्षयरोग संदर्भात ग्रामस्तरावर व्यापक जनजागृती होणे अत्यंत आवश्यक आहे. यासाठी सर्वांनी एकत्र येऊन क्षयरोगमुक्त जिल्हा करण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात यांनी केले.

जिल्हा परिषदच्या शिवाजी महाराज सभागृहात जागतिक क्षयरोग दिनानिमित्त आयोजित टिबी मुक्त ग्रामपंचायत तसेच उत्कृष्ट काम करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या पुरस्कार वितरण कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी उपमुख्य कार्यकारी अधिकारी शिवशंकर भारसाकळे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. दत्तात्रय बिराजदार, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अमोल गिते,




जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ.वर्षा गट्टे, क्षयरोग वैद्यकीय अधिकारी डॉ. दिनकर खेरोडकर आदी उपस्थित होते. अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या पुरस्कार वितरण कार्यक्रमात ते बोलत होते.

क्षयरोगाची लक्षणे सुरुवातीला साधी वाटत असली तरी ती दुर्लक्षित केल्यास गंभीर परिणाम होऊ शकतात. त्यामुळे क्षयरोगाच्या लक्षणांकडे दुर्लक्ष न करता त्वरित जवळच्या शासकीय आरोग्य केंद्रात जाऊन तपासणी करून घ्यावी. जिल्हा क्षयरोगमुक्त करण्यासाठी आरोग्य विभाग, प्रशासन आणि नागरिक यांचा सहभाग महत्त्वाचा असून सर्वांनी एकत्र येऊन जनजागृती करणे ही काळाची गरज आहे. क्षयरोगमुक्त समाज निर्माण करण्यासाठी प्रत्येकाने आपली जबाबदारी ओळखून पुढाकार घ्यावा, असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात यांनी केले.

२०३० पर्यंत क्षयरोग मुक्तीचे ध्येय जागतिक आरोग्य संघटनेच्या उद्दिष्टानुसार क्षयरोग मुक्त करण्यासाठी राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमांतर्गत जिल्ह्यात विविध उपक्रम राबविले जात आहेत. क्रेद्र शासनाने 'क्षयरोग मुक्त पंचायत' या अभिनव उपक्रमाची सुरुवात केली होती. या अंतर्गत ग्रामपंचायत स्तरावर आरोग्य तपासणी, जनजागृती आणि रुग्ण शोध मोहीम प्रभावीपणे राबविली.

जिल्ह्यात सन २०२५मध्ये एकूण २ हजार ४९८ क्षयरुग्ण आढळले होते, तर जानेवारी ते मार्च २०२६ दरम्यान ४९७ रुग्ण नोंदवण्यात आले आहेत. रुग्णांच्या सोयीसाठी आणि जलद निदानासाठी जिल्ह्यात अत्याधुनिक यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली आहे. यात डिजिटल हॅन्डहेल्ड एक्स-रे मशीन्स व CBNAAT मशीन्स आणि ११ TrueNAAT या यंत्रांच्या सहाय्याने ग्रामीण भागातही क्षयरोगाचे अचूक निदान करणे शक्य झाले आहे.

जागतिक क्षयरोग दिनाचे औचित्य साधून २०२५ सालामध्ये राबवण्यात आलेल्या 'क्षयरोग मुक्त पंचायत' अभियानात बुलढाणा जिल्ह्यातील ३२६ ग्रामपंचायतींनी निकषांची पूर्तता केली असून, त्यापैकी २२ ग्रामपंचायतींना मानाचा 'सुवर्ण' () पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच लोकसहभागातून टीबी मुक्त भारत अभियान पंतप्रधान टीबी मुक्त भारत अभियानांतर्गत जिल्ह्यात 'निक्षय मित्रांच्या' माध्यमातून ७ हजार १६६ फ ूड बास्केटचे (पौष्टिक आहार) वाटप रुग्णांना करण्यात आले आहे. या मदतीमुळे रुग्णांच्या उपचाराला गती मिळत आहे. राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमांतर्गत सन २०२५ मध्ये उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल क्षयरोग पथक बुलढाणा व शेगाव यांना प्रथम क्रमांक, संग्रामपूर व लोणार पथकांना अनुक्रमे द्वितीय व तृतीय क्रमांकाचे पुरस्कार प्रदान करण्यात आले. तसेच 'निक्षय मित्र' म्हणून मेहत्रे हॉस्पिटल व लद्धड हॉस्पिटल यांचाही सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन नितीन इंगळे यांनी तर आभार सिद्धेश्वर सोंळकी यांनी मानले.